मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 30 मार्च 2026 | पान- 1

# मालमत्ताकर वसुलीसाठी 'परफॉर्मर ऑफ द डे' उपक्रम

## 886 कोटींची वसुली; अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देत महापालिकेचा शेवटच्या टप्प्यात वेग वाढवण्याचा प्रयत्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

चालू आर्थिक वर्ष संपण्यास तीन दिवसांचा कालावधी बाकी असताना पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागाच्या वतीने मालमत्ताकर वसुलीसाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. शेवटच्या टप्प्यात जास्तीत जास्त कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी फरफॉर्मर ऑफ द डेची संकल्पना राबवून, महापालिकेच्या सोशल मीडिया पेजवर त्यांच्यासाठी विशेष अभिनंदनासाठी पोस्ट करून सन्मान केला जात आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची ही संकल्पना आहे




महापालिकेच्या वतीने नागरिकांना मालमत्ताकर भरण्यासाठी ऑनलाईन तसेच, 18 विभागीय कार्यालयात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी व थकबाकीदारांनी कर भरावा यासाठी अभय योजनेची घोषणा केली आहे. या योजनेत अंतर्गत विलंब दंडावर 90 टक्के सवलत दिली जात आहे. त्यामुळेच आत्तापर्यंत 886 कोटी रुपयांचा मालमत्ताकर वसूल करण्यात विभागाला यश आले आहे. सलग तीन दिवस सर्वाधिक कर वसुल केल्यास अशा अधिकार्यांना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे, असे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

मालमत्ताकर वसुलीसाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने फरफॉर्मर ऑफ द डेची संकल्पना राबविण्यात येत आहे. 31 मार्चअखेर जास्तीत जास्त कर वसूल करण्याचे आदेश कर संकलन विभागाला दिले आहेत, असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

शेवटच्या टप्प्यात जास्तीत जास्त कर वसूल व्हावा, या उद्देशाने 18 विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यासाठी फरफॉर्मर ऑफ द डेची संकल्पना राबविली जात आहे. या अंतर्गत एका दिवसात सर्वाधिक मालमत्ताकर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्याच्या नावासह, केलेली वसुली याची आकडेवारी महापालिकेच्या सर्व सोशल मीडिया पेजवर, व्हॉट्सअप ग्रुपवर पोस्ट करून अभिनंदन केले जात आहे.

### जास्तीत जास्त कर वसुली करण्याचे आदेश

» मालमत्ताकर वसुलीसाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने फरफॉर्मर ऑफ द डेची संकल्पना राबविण्यात येत आहे. 31 मार्चअखेर जास्तीत जास्त कर वसूल करण्याचे आदेश कर संकलन विभागाला दिले आहेत, असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

### संबंधित अधिकाऱ्यांस बक्षीस

» संकलन विभागाच्या 18 विभागीय कार्यालयातील अधिकार्यांनी जर सलग तीन दिवस सर्वाधिक कर वसुल केल्यास अशा अधिकार्यांना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे, असे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

# रहाटणीतील सार्वजनिक जागेचे टाकाऊ वस्तूंमधून सुशोभीकरण

## महिला सक्षमीकरणाचा संदेश; महापालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अभिनव उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २७ मधील रहाटणी-श्रीनगर परिसरात एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला आहे. तमारा सोसायटी, नखाते चौक परिसरातील सार्वजनिक जागेचे टाकाऊ वस्तूंच्या कल्पक वापरातून आकर्षक सुशोभीकरण करण्यात आले आहे.



या उपक्रमात सफाई कर्मचाऱ्यांनी केवळ स्वच्छता न करता टाकाऊ टायर, पाइप्स, प्लास्टिक बॉटल्स, फायबर पुतळे तसेच RRR सेंटरमध्ये जमा होणाऱ्या साड्या व अलंकारिक वस्तूंचा वापर करून रस्त्याकडील जागा आणि सार्वजनिक ठिकाणे सुंदर केली. या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेशही देण्यात आला.

या सुशोभीकरण उपक्रमाचे उद्घाटन महानगरपालिकेचे अधिकारी, नगरसेवक, सोसायटी पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक तसेच स्थानिक नागरिक आणि दुकानदार यांच्या हस्ते करण्यात आले. हा उपक्रम उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी 'ग' क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, सहाय्यक आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे, मुख्य आरोग्य निरीक्षक पृथ्वीराज कांबळे, शशिकांत मोरे, उमेश कांबळे, आरोग्य निरीक्षक गणेश राजगे तसेच आरोग्य विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डिवाईन वेस्ट मॅनेजमेंट अँड सर्व्हिसेस संस्था आणि शुभम उद्योग संस्थेने या उपक्रमात विशेष योगदान दिले.

प्रभाग २७ मधील नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, सागर कोकणे, नगरसेविका सविताताई खुळे व अर्चनाताई तापकीर यांनीही सहभाग नोंदविला. यावेळी तमारा सोसायटीचे चेअरमन संतोष जाधव, सेक्रेटरी डोंगरे व रानपिसे यांच्या हस्ते उपस्थितांचा सत्कार करण्यात आला. शहरात उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे अस्वच्छता व दुर्गंधी पसरते. यावर उपाय म्हणून अशा ठिकाणी सुशोभीकरण करून कचरा न टाकण्याचे आवाहन करण्यात येत असून नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

या उपक्रमाबाबत बोलताना अधिकारी किशोर ननवरे यांनी सांगितले की, "आरोग्य विभागाची ही कलात्मक मोहीम सर्व शहरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे." तर अतुल सोनवणे यांनी नागरिकांना कचरा वर्गीकरणाचे नियम पाळण्याचे आवाहन केले. नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य निरीक्षक गणेश राजगे यांनी केले.

# बांधकाम व्यावसायिकांवर पाणीपुरवठ्याची जबाबदारी बंधनकारक

## सदनिकाधारकांना ताबा देण्यापूर्वी पाणी देणे आवश्यक; अन्यथा कायदेशीर कारवाईचा आयुक्तांचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील शेकडो बांधकाम व्यावसायिक किंवा विकसकांनी सदनिकाधारकांना सदनिकेचा ताबा देण्यापूर्वी पाणीपुरवठ्याची जबाबदारी स्वीकारत लेखी हमीपत्र दिले आहे. त्यांनी ती जबाबदारी पार पाडणे बंधनकारक आहे. पाणीपुरवठा करण्याकडे दुर्लक्ष केल्यास किंवा पाणीपुरवठ्याचा आर्थिक भार हाऊसिंग सोसायटीवर टाकल्यास महापालिकेकडून संबंधित बांधकाम व्यावसायिकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शनिवारी (दि.28) दिला आहे

मुंबई उच्च न्यायालयातील 10 एप्रिल 2023 च्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने पाणीपुरवठ्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीची बैठक झाली. त्यात ते बोलत होते. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस आयुक्त सूर्यवंशी यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरिदे तसेच, पुणे महापालिका व पीएमआरडीएचे अधिकारी उपस्थित होते.

मुंबई उच्च न्यायालयातील 10 एप्रिल 2023 च्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने पाणीपुरवठ्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीची बैठक झाली. त्यात ते बोलत होते. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस आयुक्त सूर्यवंशी यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरिदे तसेच, पुणे महापालिका व पीएमआरडीएचे अधिकारी उपस्थित होते.



### भामा आसखेड योजनेपर्यंत अंतरिम व्यवस्था

» भामा आसखेड पाणी योजना पूर्णतः कार्यान्वित होईपर्यंत समाविष्ट भागांतील पाणीपुरवठ्याची जबाबदारी विकसकांवरच राहणार आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतर शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्याची अपेक्षा आहे. तोपर्यंत नागरिकांना अडचणी येऊ नयेत यासाठी तात्पुरत्या उपाययोजना करण्यात येत आहेत. महापालिका आणि संबंधित यंत्रणा समन्वयाने काम करत असून, भविष्यात नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### विकसकांची जबाबदारी स्पष्ट

» पिंपरी-चिंचवड शहरातील बांधकाम व्यावसायिकांनी सदनिकाधारकांना ताबा देण्यापूर्वी पाणीपुरवठ्याची जबाबदारी स्वीकारत लेखी हमीपत्र दिले आहे. त्यामुळे ही जबाबदारी पूर्ण करणे त्यांच्यासाठी बंधनकारक आहे. अनेक ठिकाणी बांधकाम पूर्ण झाल्यानंतर विकसक ही जबाबदारी झटकत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. महापालिकेने याकडे गांभीर्याने पाहत आता कठोर भूमिका घेतली आहे. हमीपत्रानुसार पाणीपुरवठा न केल्यास संबंधितांवर कारवाई होणार असल्याने विकसकांना जबाबदारी पार पाडावी लागणार आहे.

### तक्रार नोंदवा, कारवाई होणार

» हाऊसिंग सोसायट्यांमध्ये पाणीपुरवठ्याबाबत अडचणी निर्माण झाल्यास नागरिकांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाकडून तत्काळ चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाणार आहे. या प्रक्रियेमुळे पाणीपुरवठ्यात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होईल. नागरिकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी महापालिका सज्ज असून, पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यावर भर दिला जात आहे.

# उन्हाळ्यात पाणीटंचाई टाळण्यासाठी महापौरांचे निर्देश

## महापौर रवि लांडगे यांनी महापालिका आयुक्तांना तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाळा हंगाम समीप येत असून उपलब्ध जलसाठा, भूजल पातळीतील घट व वाढती पाण्याची मागणी लक्षात घेता शहरात संभाव्य पाणीटंचाईची स्थिती निर्माण होऊ नये, यासाठी महापौर रवि लांडगे यांनी महापालिका आयुक्तांना तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.





नागरिकांना नियमित, समतोल व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा सुनिश्चित करणे ही महापालिकेची वैधानिक जबाबदारी असून त्यानुसार सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश महापौरांनी दिले.

महापौरांनी प्रशासनाला उन्हाळा पूर्व कृती आराखडा (SUMMER ACTION PLAN) तयार करून प्रत्येक विभागाला स्पष्ट जबाबदाऱ्या सोपविण्याच्या सूचना केल्या. तसेच उपलब्ध धरण साठा, जलशुद्धीकरण केंद्रे व वितरण यंत्रणेचे सखोल परीक्षण करून पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे.

शहरातील मुख्य व उपजलवाहिन्यांमधील गळती तातडीने शोधून दुरुस्ती करण्यासह अनधिकृत नळजोडण्या व पाणीचोरीवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. संभाव्य टंचाईग्रस्त भागांची पूर्वनियोजित यादी तयार करून आवश्यकतेनुसार टँकर पुरवठा व्यवस्था सज्ज ठेवण्याचेही सांगण्यात आले.

याशिवाय सार्वजनिक बोअरवेल, विहिरी व पूरक जलस्रोत कार्यान्वित ठेवण्याबरोबरच पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींवर तातडीने प्रतिसाद देण्यासाठी सक्षम तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्याचे निर्देश महापौरांनी दिले. तसेच पाणी बचत, पुनर्वापर व अपव्यय नियंत्रणाबाबत जनजागृती करण्यावरही विशेष भर देण्यात आला आहे.

“उन्हाळ्यात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने नियोजनबद्ध आणि परिणामकारक उपाययोजना तातडीने राबविणे आवश्यक आहे. पाणीपुरवठा ही मूलभूत गरज असून त्यामध्ये कोणतीही दिरंगाई किंवा निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही. सर्व विभागांनी समन्वय साधून काम करत नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळेल याची खात्री करावी,” असे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

सदर बाब अत्यंत महत्त्वाची असून सर्व विभागांनी समन्वय साधून तात्काळ अंमलबजावणी करावी. उन्हाळा कालावधीत नागरिकांना पाणीटंचाई जाणवू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना काटेकोरपणे राबवाव्यात, असे स्पष्ट निर्देश महापौरांनी आयुक्तांना दिले आहेत.

# समाविष्ट गावांतील पाणीप्रश्न पुन्हा ऐरणीवर

## समाविष्ट गावांमधील पाणी प्रश्नावर पालिकेचे कडक पाऊल; हमीपत्र दिलेल्या बिल्डरांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत २०१७ आणि २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या ३२ गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी पालिकेने वेगवेगळया पाणी पुरवठा योजना प्रस्तावित केल्या आहेत. या गावांना अद्याप पालिका पाणी देत नाही. पालिकेचा पुरेसा पाणीपुरवठा होईपर्यंत समाविष्ट गावांतील विकसित मिळकतीमधील नागरिकांना पाणी देण्याची जबाबदारी पालिकेने विकसकांवर टाकली असून त्यासाठीचे हमीपत्रही घेतलेले आहे.



या भागातील निवासी व व्यावसायिक बांधकामे थांबू नयेत यासाठी हे पाऊस टाकले आहे. २०२० पासून ते मार्च २०२५ पर्यंतच्या हमीपत्र दिलेल्या २४१ बांधकाम प्रकल्पांची माहिती पालिकेच्या संकेतस्थळावर टाकलेली आहे. बांधकाम विभागाने याचे आदेश काढले असून समाविष्ट गावांत घर घेतलेल्या तसेच नव्याने घर घेणाऱ्यांना ही माहिती उपयुक्त ठरणार आहे.

समाविष्ट अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू आहेत. बांधकाम व्यावसायिक परवानगी घेताना हमीपत्र महापालिकेस देतात. मात्र, बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आता पाणी देण्याची जबाबदारी पालिकेची असल्याचे सांगत सोसायटीवर पाण्याचा भार टाकतात. त्यामुळे सोसायटीला लाखो रूपयांचे पाण्याचे टँकर विकत घ्यावे लागत आहेत.

तसेच, गाव आता पालिकेत आल्याने पाण्याची जबाबदारी पालिकेची असल्याचे सांगत पाणी पुरविणे बंद केले जाते. त्यामुळे सोसायटीमधील नागरिक, महापालिका तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडे तक्रारी करतात. प्रत्यक्षात, बांधकाम व्यावसायिकांनी दिलेल्या हमीपत्रानुसार पालिकेकडून कोणताही पाणीपुरवठा झाला नाही किंवा अपुरा पाणीपुरवठा झाल्यास पाणी देण्याची जबाबदारी आपली असल्याचे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

सदनिकाधारकांच्या खरेदी करारनाम्यामध्ये पाणीपुरवठ्याबाबत ही वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करण्याची जवाबदारी विकासकाची असते. मात्र, ही माहिती लपविली जाते. त्यामुळे, २०२० पासून ते ३१ मार्च २०२५ पर्यंत पाण्यासाठीचे हमीपत्र देणाऱ्या विकसकांची यादीच पालिकेच्या संकेतस्थळावर जाहीर केली आहे.

### विकसकांच्या हमीपत्रांची अंमलबजावणी नाही

**» पालिकेने पाणीपुरवठ्याची जबाबदारी तात्पुरती विकसकांवर टाकत हमीपत्र घेतले आहे. मात्र, अनेक विकसक बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ही जबाबदारी झटकत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सोसायट्यांना मोठ्या प्रमाणात खर्च करून पाण्याचे टँकर घ्यावे लागत आहेत. खरेदी करारनाम्यात पाणीपुरवठ्याची माहिती नमूद करणे बंधनकारक असले तरी ती अनेकदा लपवली जाते. यामुळे नागरिकांची फसवणूक होत असून, प्रशासनाकडे तक्रारींचा ओघ वाढत आहे.**

### पालिकेची पावले आणि पुढील दिशा

**» पुणे महानगरपालिकेने २०२० ते ३१ मार्च २०२५ दरम्यान हमीपत्र देणाऱ्या २४१ प्रकल्पांची यादी संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या निर्णयामुळे घर खरेदी करणाऱ्यांना वस्तुस्थिती समजण्यास मदत होणार आहे. निवडणुकीनंतर लोकनियुक्त प्रतिनिधी आल्याने पाणीप्रश्न अधिक ठळकपणे मांडला जात आहे. स्थायी समिती आणि मुख्यसभेत यावर चर्चा सुरू असून, समाविष्ट गावांसाठी स्वतंत्र बैठका घेतल्या जात आहेत. भविष्यात या भागांना नियमित पाणीपुरवठा देण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.**

### समाविष्ट गावांचा वाढता पाणीप्रश्न

**» पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमध्ये पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पालिकेने स्वतंत्र पाणीपुरवठा योजना प्रस्तावित केल्या असल्या तरी अद्याप नियमित पुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे नागरिकांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. शहराच्या वाढत्या विस्तारामुळे आणि नव्या बांधकामांमुळे पाण्याची मागणी वाढली आहे. मात्र, त्यानुसार पायाभूत सुविधा विकसित झालेल्या नाहीत. त्यामुळे या गावांतील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे.**

# विद्यापीठाचा अर्थसंकल्प मंजूर... नव्या योजनांचा समावेश...

## कसबा मतदारसंघातील दवाखान्यात विकासकामे; नागरिकांसाठी आरोग्य सुविधा अधिक सक्षम होणार

**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुमारे ८३ कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प सादर केला. अर्थसंकल्पानुसार विद्यापीठाचे एकूण अपेक्षित उत्पन्न ६१९ कोटी रुपये असून, ६२४ कोटी रुपये खर्चासह विद्यापीठ निधीतून कल्याणकारी आणि अन्य निधीसाठी ७८ कोटी रुपये असा एकूण ७०२ कोटी रुपये खर्च दाखवण्यात आला आहे. काही नव्या योजना मांडण्यात आल्या असून, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनांसाठी १० कोटी रुपयांहून अधिक रकमेची तरतूद करण्यात आली आहे.



विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अधिसभेत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी अर्थसंकल्प सादर केला. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव चारुशीला गायके आदी या वेळी उपस्थित होते. गेल्या वर्षीही विद्यापीठाने ८२ कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प सादर केला होता. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मांडलेल्या अर्थसंकल्पावर चर्चा करून अधिसभासदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यात आली.

डॉ. घोरपडे म्हणाले, 'विद्यापीठाचे कामकाज अद्ययावत आणि तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यंदा नव्याने विकासकामे सुरू न करता पूर्वीची कामे पूर्ण करण्यावरच भर देण्यात आला आहे. बांधकामांमध्ये नियमितता, गतिमानता, कालबद्धता आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठ आवारातील इमारतींच्या बांधकामासाठी ४९ कोटी ५५ लाख रुपये, इतर सुविधा-सुधारणांसाठी २३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.'

विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेपैकी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अर्थसाहाय्य योजनेसाठी १ कोटी २५ लाख, महात्मा जोतिराव फुले अर्थसाहाय्य योजनेसाठी २ कोटी ३० लाख, राजर्षी छत्रपती शाहू महाराज अर्थसाहाय्य योजनेसाठी २ कोटी ३० लाख, स्वामी विवेकानंद अर्थसाहाय्य योजनेसाठी २ कोटी २५ लाख, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले अर्थसाहाय्य योजना आणि छत्रपती शिवाजी महाराज अर्थसाहाय्य योजनेसाठी प्रत्येकी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

> **अर्थसंकल्पामध्ये प्रथमच निधी आधारित पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यानुसार सुमारे ८३ कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला.**
>
> **- चारुशीला गायके, वित्त व लेखा अधिकारी आणि प्रभारी कुलसचिव.**

# पुणे विमानतळ ठरले देशात अव्वल !

## पुणे विमानतळाचा देशात डंका; प्रवासी सेवा आणि गुणवत्तेत पटकाविला प्रथम क्रमांक, 31 मार्चला होणार गौरव.

**पुणे | प्रतिनिधी**

सांस्कृतिक राजधानी, विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहराने देशाच्या पातळीवर पुन्हा एकदा चांगली कामगिरी केली आहे. देशातील सर्व विमानतळांमध्ये पुणे विमानतळाने पहिला क्रमांक मिळविला आहे. पुणे विमानतळावर प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सेवांची गुणवत्ता आणि त्यांच्या समाधानाबाबत झालेल्या सर्वेक्षणात पुणे विमानतळाने हा पहिला क्रमांक मिळविला आहे.

प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यात पुणे विमानतळ देशात सर्वोत्तम ठरले आहे. सातत्यपूर्ण सेवा सुधारणा, प्रवाशांना गुणवत्तापूर्ण सुविधा आणि कार्यक्षम व्यवस्थापनामुळे पुणे विमानतळाने हा बहुमान मिळविला आहे. भारतीय विमानतळ प्राधिकरणाने जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, पुणे विमानतळाने सेवा गुणवत्तेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या स्पर्धेत गोवा विमानतळाला द्वितीय, तर इंदूर विमानतळाने तृतीय क्रमांक मिळविला आहे. त्यामुळे पुणे विमानतळाच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे.

देशातील सर्व विमानतळांवर 'एसीआय-एसीक्यू सर्व्हे २०२५' (एअरपोर्ट क्वालिटी सर्व्हे) करण्यात आला. हे सर्वेक्षण पूर्णपणे प्रवाशांच्या अनुभवावर आधारित होते. यामध्ये विमानतळावरील स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था, प्रवेश प्रक्रिया (चेक-इन), कर्मचारी वर्गाची वर्तणूक, उपलब्ध सोयी-सुविधा आणि समाधान अशा विविध निकषांचा विचार करण्यात आला. या सर्व आघाड्यांवर पुणे विमानतळाने बाजी मारली आहे. भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या ३१ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून, ३१ मार्च २०२६ रोजी या पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल. या वेळी पुणे विमानतळाच्या अधिकाऱ्यांना विशेष सन्मानित केले जाणार आहे.

या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, 'पुणे विमानतळाने देशात प्रथम क्रमांक मिळवणे ही अभिमानाची बाब आहे. प्रवाशांना उत्तम सेवा देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे हे यश आहे. आगामी काळातही पुणे विमानतळ प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुविधा देण्यासाठी कटिबद्ध राहील.'




### प्रवाशांसाठी वाढत्या सुविधा

» पुणे विमानतळावर नवीन टर्मिनल सुरू झाल्यानंतर प्रवाशांच्या सोयींमध्ये मोठी भर पडली आहे. वाढत्या प्रवासी संख्येला लक्षात घेऊन विविध सुविधा अधिक सक्षम करण्यात आल्या आहेत. चेक-इन प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून सुरक्षा व्यवस्थाही अधिक कडक आणि कार्यक्षम करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय उड्डाणांनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### राष्ट्रीय स्तरावर गौरव

» भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या 31 व्या वर्धापन दिनानिमित्त 31 मार्च 2026 रोजी पुणे विमानतळाचा सन्मान करण्यात येणार आहे. या यशामुळे पुणे विमानतळाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. गोवा आणि इंदूर विमानतळांना मागे टाकत पुण्याने देशात आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही या यशाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. भविष्यातही जागतिक दर्जाच्या सुविधा देण्याचा निर्धार व्यक्त करत पुणे विमानतळ प्रवाशांसाठी अधिक सक्षम होणार असल्याचे संकेत दिले आहेत.

### सेवागुणवत्तेत अव्वल कामगिरी

» पुणे विमानतळाने 'एसीआय-एसीक्यू सर्व्हे 2025'मध्ये देशात प्रथम क्रमांक मिळवत सेवागुणवत्तेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. प्रवाशांच्या अनुभवावर आधारित या सर्वेक्षणात स्वच्छता, सुरक्षा, चेक-इन प्रक्रिया, कर्मचारी वर्गाची वर्तणूक आणि उपलब्ध सुविधा यांचा सखोल आढावा घेण्यात आला. या सर्व निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करत पुणे विमानतळाने अव्वल स्थान पटकावले. सातत्याने सुधारणा करण्याची वृत्ती आणि व्यवस्थापनाची कार्यक्षमता यामुळे हे यश शक्य झाले आहे.

# पुणे जिल्हा परिषदेला ई-गव्हर्नन्समध्ये राज्यात प्रथम क्रमांक

## 150 दिवसांच्या कार्यक्रमात 196.25 गुण मिळवत पुणे जिल्हा परिषदेची उत्कृष्ट कामगिरी

**पुणे | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत झालेल्या मूल्य मापनात पुणे जिल्हा परिषदेला २०० पैकी १९६.२५ गुण प्राप्त करुन राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे; सेवाकर्मी कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषदेची 'प्रथम' क्रमांकाने निवड झाली आहे. आज मुंबई येथील सह्याद्री सभागृहात पार पडलेल्या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले

मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील शासकीय कार्यालयांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये सात महत्त्वाच्या घटकांवर- कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमता व ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर तसेच भौगोलिक माहिती प्रणालीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यालयांची निवड करण्यात आली.

श्री. गजानन पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून जिल्हा परिषदेने डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात अभिनव उपक्रम राबवून नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व जलद सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. जिल्हा परिषदेकडून INTEGRATED WORKS MANAGEMENT SYSTEM (IWMS), 'स्पंदन', ई-लॉटरी, SYSTEM OF PENSION ILLUSTRATION (SOPI), क्यूआर कोड आधारित कर संकलनप्रणाली यांसारख्या नाविन्यपूर्ण प्रणाली विकसित करण्यात आल्या असून, यामुळे प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक झाले आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ हे द्विभाषिक, सुरक्षित व सुलभ असून नागरिकांना सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देते. 'आपले सरकार' प्रणालीत १०० टक्के सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ई-ऑफिस प्रणालीमुळे कागदविरहित प्रशासनाला गती मिळाली असून हजारो नस्ती जलद निकाली काढण्यात आल्या आहे. तसेच इंटिग्रेटेड स्मार्ट डॅशबोर्डद्वारे डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया सक्षम झाली आहे.



> डिजिटल प्रशासन ही काळाची गरज आहे. पुणे जिल्हा परिषद नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासवासाठी सतत प्रयत्नशील राहील आणि राज्यातच नव्हे तर देशातही एक आदर्श मॉडेल म्हणून उभी राहील
>
> - गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी